# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


पुणे पोलीस

**प्रेसनोट क्र. ३०५५ दि. २२ /०९ /२०१९**

प्रेस नोट दिनांक - २२/०९/२०१९

**युनिट - ३ गुन्हे शाखा पुणे ची कामगिरी - भारतातील नामांकित कंपनीचे घरगुती वापराचे ब्रॅंडच्या नावाखाली बनावट हॅंडवॉश, रुमफ्रेशनर,टॉयलेट क्लिनरची विक्री करुन ग्राहक व शासनाची फसवणुक करणारा व्यापारी जेरबंद सोळा लाखाचा ऐवज हस्तगत**

युनिट - ३ गुन्हे शाखा पुणे शहर चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंन्द्र मोकाशी व त्यांचेकडील पोलीस अधिकारी व इतर स्टाफ हे दैनदिन कामकाज करत असताना पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर व अतुल साठे यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की कात्रज कोंढवा रोड गोकुळ नगर गल्ली नं ४ कोंढवा बु पुणे या भागात एका पत्र्याचे गोडावुनमध्ये डायव्हर्सी , लायझॉल, विम, व्हिल डिटर्जंट पावडर फेअर अँड लव्हली , विको टर्मरीक , हार्पिक , कोलीन या भारतातील नामांकीत कंपन्यांचे उत्पादन असणारे टॉयलेट क्लिनर , डिश वॉश , फलोअर क्लिनर , ग्लास क्लिनर या मालासारखा हुबेहुब बनावट निकृष्ठ दर्जाचा माल तयार करुन त्या प्रॉडक्टवर नामांकित कंपनीचे लेबल लावुन सदरची उत्पादने पुणे शहर व इतर ठिकाणचे दुकानदारांना पुरवठा करण्यात येवुन ती ग्राहकाला विक्री केली जातात व अशाप्रकारे ग्राहकांची फसवणुक केली जाते. अशी खात्रीशीर बातमी मिळाली होती. वपोनि राजेंन्द्र मोकाशी यांनी त्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना माहीती दिली त्यानंतर त्यांचे मार्गदर्शनाखाली पुढील कारवाई करण्यात आलेली आहे.

दिनांक - २०/०९/२०१९ रोजी १८/१० वा चे सुमारास भाविका बायोकेम सर्वे नं ४८ गल्ली नं ५ गोकुळनगर कात्रज कोंढवा रोड पुणे - ४८ या ठिकाणी असलेल्या गोडावुनवर पोलीसांनी छापा टाकला त्यावेळी सदर ठिकाणी संशयीत इसमनामे - हितेश राघवजी रावरिया वय - ३० रा - सिलीकॉन विश्व बिल्डिंग बी विंग प्लॅट नं २०२ जेएसपीएम कॅंपस न-हे रोड पुणे हा गोडावुनमध्ये वेगवेगळया **नामांकित कंपन्यांचे उत्पादन असणारे टॉयलेट क्लिनर , डिश वॉश , फलोअर क्लिनर , ग्लास क्लिनर वगैरे बनावट माल तयार करत असताना रंगेहात पकडण्यात आलेले आहे. त्याठिकाणी जवळच असलेल्या दोन गोडावुन मध्ये व्हिल डिटर्जंट पावडर , फेअर अँड लव्हली क्रिम , हार्पिक लिक्विड, लायझॉल , विको टर्मरिक क्रिम , पॅराशुट ऑईल , विम, डेटॉल हॅंडवॉश , कोलीन फलोअर क्लिनर , ओडोनिल एअर फ्रेशनर, डायव्हर्सी या नामाकिंत कंपनीची बनावट तयार केलेल्या मालाचा साठा , बनावट तयार केलेले वेगवेगळया कंपनीचे नावाचे स्टिकर, कच्चा माल असा एकुण सोळा लाख चारशे रुपयाचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.** सदर प्रकरणी हितेश राघवजी रावरिया वय-३० यास अटक करण्यात आलेले आहे. सदर व्यवसायाचे मालक रामजी महादेव पटेल वय-४२ रा - लेकटाऊन बिल्डिंग नंबर ई / २ प्लॅट नंब ५०१ बिबवेवाडी पुणे व त्यांचे इतर साथीदार पोलीस शोध घेत आहे. सदर कारवाई करत असताना पोलीसांनी संबधीत कंपनीची माहीती घेवुन त्यांचेशी संपर्क साधुन त्यांना सदर प्रकाराबाबत माहीती दिली होती . कारवाईच्या दरम्यान संबधीत कंपनीचे तपासणी अधिकारी नेव्रिका कन्सल्टींग अँड इन्व्हेस्टिगेशन ६१३ शांतीलाल कंपाऊड सहावा मजला खेरवाडी बांद्रो मुंबई चे सिनियर एक्झिक्युटिव्ह आखलेश मुख्यनाथ पांडे व श्री शंकर काळुसिंग ताम्राकार व त्यांचे सहायक मंगेश जगन्नाथ देशमुख रा-सर्वे नं १३४ ओंकार कॉलनी लेन नं - ३ वारजे पुणे व योगेश दशरथ मोरे रा - ८१/बी भारतीनगर कोथरुड पुणे यांनी घटनास्थळी येवुन पाहणी केली आहे. सिनियर एक्झिक्युटिव्ह आखलेश मुख्यनाथ पांडे यांनी मालाची पाहणी करुन त्या मालापैकी हिंदुस्थान युनेलिव्हर कंपनी लिमिटेड सीबीडी बेलापुर जिल्हा - ठाणे या कंपनीचा माल व्हिल डिटर्जंट पावडर, विम लिक्विड सोप व फेअर अँड लव्हली हा माल बनावट तयार केलेला निकृष्ठ दर्जाचा नकली माल आहे व इतर माल हा वेगवेगळया नामांकित कंपनीचा बनावट तयार केलेला नकली माल असल्याचे सांगीतले आहे.

**संशयीत व्यापारी आरोपी हे मुळचे राहणार मुपो - मेघपर बच्छाव तालुका व जिल्हा कच्छ गुजरात येथील आहेत ते सुमारे दोन वर्षापासुन गोडावुन भाडयाने घेवुन राजरोसपणे सदरचा व्यवसाय भर मध्यवस्तीत करत होते परंतु त्यांचा आजुबाजुस राहणारे स्थानिक नागरिकांना थांगपत्ता नव्हता** त्यांनी संगणमत करुन आपले स्वतःचे अथिक फायदयासाठी भारतातील नामांकित कंपन्यांचा बनावट माल तयार केलेला आहे. तसेच त्यांनी स्वतःची फोलेक्स नावाची कंपनी रजिस्टर नसताना सदर कंपनी रजिस्टर आहे असे भासविण्यासाठी उत्पादनावरील लोगोवर वर्तुळामध्ये इंग्रजीत आर असे दर्शवुन त्या नावाने मालाचे उत्पादन करुन तो माल बाजारातील वेगवेगळया व्यापा-यांना विक्री करुन त्यांचे मार्फत सदर मालाची सर्व सामान्य ग्राहकांना विक्री करुन त्यांची फसवणुक केल्याचे तसेच शासनाची फसवणुक केल्याचे तसेच भारतातील नामांकित कंपन्यांचे स्वामित्वाचे हक्काचे उल्लंघन केल्याचे उघडकीस आलेले आहे. सदरबाबत आरोपीविरुध्द कोंढवा पोलीस स्टेशन पुणे गुरनं - ७७९/२०१९ भादंवि कलम ४२०, ४६८, ४७१, ३४, सह कॉपी राईट ॲक्ट सन १९५७ चे कलम ५१, ६३, ६४, ६५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यामध्ये आरोपी हितेश राघवजी रावरिया यास अटक करण्यात आलेली आहे. मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो लष्कर न्यायालया पुणे शहर यांचे न्यायालयात आरोपीस हजर करण्यात आले त्यावेळी सरकारी वकील सो ज्योती वाघमारे - बा-हाळीकर यांनी आरोपीची तपासकामी १४ दिवस पोलीस कोठडी देण्याची मागणी केली होती. मा. न्यायालयाने **दिनांक - ३०/०९/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.**

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. बच्चन सिंग, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे पुणे डॉ. शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, सपोनि भालचंद्र ढवळे , पोउपनिरी संजय गायकवाड व किरण अडागळे व गुन्हे युनिट-३ पथकातील पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर, अतुल साठे, दत्तात्रय गरुड, प्रविण तापकीर, संदिप तळेकर, शकील शेख, मच्छिंन्द्र वाळके, गजानन गानबोटे, दत्तात्रय गरुड, सुजित पवार, यांनी केली आहे.